## <u>निशाणी क्र.२७ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ व नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

**<u>वादीचे थोडक्यात कथन असे की</u>,**

०२. प्रस्तुत दावा वादी यांनी वाद मिळकतीमध्ये वाटणी करून ताबा मिळणेबाबत दाखल केलेले आहे. वाद जमिनीत वादींचा १/३ हिस्सा असल्याने दाव्याचे क्लेमक्लॉजमध्ये व विनंतीमध्ये समसमान ऐवजी १/३ हिश्याची वाटणी करुन ताबा मिळणे अशी दुरूस्ती करणे न्यायाचे आहे. तसेच सदर दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. १ सरुबाई साळवे यांनी गट क्र. ४४९ मधील ७८ आर जमीन दिनांक ३०.०६.२०२३ रोजी खरेदीखत क्र. ३६९३/२०२३ राजेंद्र माणिकराव तांगडे यांच्या हक्कात करुन दिले. तसेच प्रतिवादी क्र. २ उषा बोर्डे यांनी गट क्र. ४४९ मधील ८० आर जमीन दिनांक १८.०४.२०२३ रोजी खरेदीखत क्र. १९०६/२०२३ दिव्यम गणेश वाघ व आर्यन किशोर वाघ यांच्या हक्कात करुन दिले. त्यामुळे त्यांना प्रतिवादी म्हणून दाव्यात समाविष्ट करून अर्जात नमुद दुरूस्ती करण्याची परवानगी मिळण्याकरिता अर्ज दाखल केलेला आहे.

०३. प्रतिवादी क्र. १ यांनी निशाणी क्र. २८ वर आपले म्हणणे देवून असे कथन केले की, वादी यांनी दावा दुरूस्तीसाठी दाखल केलेला अर्ज मुळ दाव्यातील त्रुटी भरुन काढण्यासाठी प्रस्तुत प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या कैफियत नंतर दाखल केलेला आहे. तसेच सदरील दुरूस्तीमुळे प्रतिवादी यांच्या कैफियत मधील निवेदनास बाधा पोहोचते. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

०४. अर्ज त्यावरील शपथपत्र, प्रतिवादी यांचे म्हणणे यांचे अवलोकन करुन

वादी यांच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. दाव्यामध्ये अर्जात नमूद दुरूस्ती करणे आवश्यक आहे. सदर दुरुस्ती अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीचे काहीही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्यासाठी व वादी, प्रतिवादी मधील वादाचे कायमचे निराकरण होण्यासाठी मदत होणार आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने अर्जात मागितलेली दुरुस्ती करण्यास परवानगी देणे उचित होणार आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. वादी यांनी निशाणी क्र. २७ वरील अर्जात मागितलेली दुरुस्ती आदेश तारखेपासून १४ दिवसांमध्ये करावी व तशी दावा दुरुस्तीची प्रत दाव्याचे कामी दाखल करावी.

०३. वादी यांनी खर्चाची रक्कम रुपये २००/– (रक्कम रुपये दोनशे फक्त) प्रतिवादी यांना द्यावी.

स्वाक्षरित/–
(आर. व्ही. पाटील )
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
भोकरदन.

दिनांकः ०७.११.२०२३.
भोकरदन.

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे आहे.

लघूलेखकाचे नावः यु. आर. दसरे
न्यायालयाने नावः दिवाणी न्यायालय क. स्तर भोकरदन
मा. साहेबांनी चेक केले
व पी.डी.एफ. दिनांकः ०७.११.२०२३.

स्वाक्षरित/–
लघुलेखकाची सही